पदोन्नतीच्या वेळी वेतन निश्चितीकरता
विकल्प—स्पष्टीकरण

महाराष्ट्र शासन

## वित्त विभाग

शासन परिपत्रक ज्ञापन क्रमांक वेतन-१०८५/सीआर-७९९/८५/सेवा-३
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ डिसेंबर १९८५.

CR1985120501

—(१) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक पीएवाय-१०८२/सीआर-११०० (एक)/एसईआर-३, दिनांक ६ नोव्हेंबर १९८४.
(२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक पीएवाय-१०८२/सीआर-११०० (दोन)/एसईआर-३, दिनांक ६ नोव्हेंबर १९८४.
(३) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक पीएवाय-१०८२/सीआर-११०० (एक/दोन)/एसईआर-३, दिनांक २९ जानेवारी १९८५.
(४) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक वेतन-१०८५/सीआर-९०९/सेवा-३, दिनांक १५ ऑक्टोबर १९८५.

## परिपत्रक ज्ञापन

[illegible]ल्या पदावर वार्षिक वेतनवाढ देय झाल्यानंतर वेतनाची पुर्ननिश्चिती करून घेण्यासंबंधीचा विकल्प शासकीय कर्मचाऱ्यांना देण्यात आल्यानंतर या प्रकारच्या वेतन निश्चितीच्या संदर्भात काही विभाग प्रमुखांकडून मुद्दे स्पष्टीकरणासाठी उपस्थित करण्यात आले होते. या विविध मुद्यांबाबतचे स्पष्टीकरण खालीलप्रमाणे करण्यात येत आहे :—

| अनुक्रमांक | संदेहाचे मुद्दे | स्पष्टीकरण |
| --- | --- | --- |
| १ | पदोन्नती जर तात्पुरत्या स्वरूपाची असेल तर वेतनाच्या पुर्ननिश्चिती-करिता विकल्प देता येईल का ? | नाही. पदोन्नती जर तात्पुरत्या स्वरूपाची असेल तर विकल्प अनुज्ञेय नाही. परंतु तात्पुरत्या स्वरूपातील पदोन्नती खंडीत न होता ती पुढे नियमित झाली तर अशा कर्मचाऱ्याला प्रारंभीच्या पदोन्नतीच्या दिनांकापासून वेतननिश्चितीच्या संदर्भात विकल्प देता येईल. मात्र असा विकल्प संबंधित कर्मचाऱ्याने पदोन्नती नियमित केल्याचे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत दिला पाहिजे. |
| २ | वरच्या पदावर पदोन्नती झाल्यामुळे जेथे वेतनाची निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम ११(१)(ए) प्रमाणे होते. अशा सर्व प्रकरणांमध्ये विकल्प अनुज्ञेय आहे का ? | नेहमीच्या पदोन्नतीच्या मार्गाने (Direct line of promotion) पदोन्नत न होता जर एखादा कर्मचारी संवर्गाबाहेरील पदावर बदलीने, प्रतिनियुक्तीने किंवा अन्य मार्गाने पदोन्नत झाला तर अशा कर्मचाऱ्याला वेतन निश्चिती संबंधीचा विकल्प अनुज्ञेय नाही. |
| ३ | ज्या प्रकरणामध्ये वेतनाची निश्चिती, शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक पीएवाय-१०८२/सीआर-११०० (एक)/एसईआर-३, दिनांक ६ नोव्हेंबर, १९८४ मधील परिच्छेद १(बी) प्रमाणे होते अशा प्रकरणामध्ये महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम ११ खाली दिलेल्या पहिल्या परंतुकाप्रमाणे वेतन निश्चिती अनुज्ञेय आहे का ? | नाही. महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम ११ खाली दिलेल्या पहिल्या परंतुकाप्रमाणे नियमित पदोन्नतीच्या पूर्वी तेच पद अथवा त्याच किंवा समरूप समय श्रेणीमधील अन्य पद धारण केले असेल तर शासन निर्णय वित्त विभाग दिनांक ६ नोव्हेंबर, १९८४ मधील परिच्छेद १(बी) प्रमाणे वेतन निश्चितीचे प्रकरण नियमित करताना पूर्वीच्या अस्थायी वेतनाला संरक्षण मिळणार नाही. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

म. का. आरोळ,
अवर सचिव, वित्त विभाग.

(शा.मु.नु.) एच २४३२ (१०,०००—१-८६)

[कृ. भा. प.

प्रति,

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर,
महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
*प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई,
*प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
*प्रबंधक, लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड फाईल, वित्त-विभाग, एसईआर-३.

---

*पत्राद्वारे.

---

१९८६ चा क्रमांक

माहिती व मार्गदर्शनाकरिता प्रत रवाना

क्र. जे-१/सी. आर. २३५१/८६
पुणे, दिनांक 20 FEB 1986

प्रत- उपसंचालक भूमि अभिलेख पुणे/मुंबई/नाशिक/औरंगाबाद यांचेकडे माहिती व कार्यवाहीसाठी अग्रेषित.

२/- त्यांना विनंती करण्यात येते की, सदर बाब त्यांनी आपले अधिनस्थ कार्यालयाचे नजरेस आणावी.

जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख [म. रा.] पुणे यांचेकरिता

प्रत /- आर. के.

उपसंचालक भूमि अभिलेख यांचे कार्यालय, पुणे
दिनांक 21 FEB 198
शाखा
क्रमांक